Shri Shivaji Education Society, Amraviti's

# Dhanwate National College

Congress Nagar, Nagpur

**Established in 1932**

**College with Potential for Excellence Status by UGC, New Delhi**
**Recognized Centre for Higher Learning and Research**
**Institutional Member of Asia Pacific Quality Network, Shanghai**
**Accredited 'B+' Grade, CGPA 2.53 by NAAC Banglore**





## 4th Cycle
## Assessment & Accreditation by NAAC

CRITERION V - STUDENT SUPPORT AND PROGRESSION

## 5.1 - Student Support

**5.1.5 - The Institution has a transparent mechanism for timely redressal of student grievances including sexual harassment and ragging cases**



Dr. Panjabrao alias Bhausaheb Deshmukh
Founder President

Shri Shivaji Education Society, Amravati's (Regd. No. F. 89)

**DHANWATE NATIONAL COLLEGE**

Congress Nagar, Nagpur.

Estd. 1935

'College with Potential for Excellence' (C.P.E.) By U.G.C. Delhi

NACC ACCREDITED 'B+' GRADE, CGPA 2.53

RECOGNISED CENTER FOR HIGHER LEARNING AND RESEARCH

INSTITUTIONAL MEMBER OF ASIA PACIFIC QUALITY NETWORK, SHANGHAI

Hon. Shri Harshwardhan P. Deshmukh
President

Dr. J. D. Wadate
M. Com., M. Phil., Ph.D.
Principal


No./DNC / 248/2022-2023

Date : 27 / 12 / 2022

## ***Self Declaration***

This is to certify that, the information, report true copies of the supporting documents, numerical data and weblinks furnished in this file are verified by IQAC and the head of the institution and found correct.

Hence this certificate is issued.

**Dr. K. D. Meghe**
**IQAC Coordinator**

**Dr. J. D. Wadate**
**Principal**


Phone: (O) (0712) 2422759, 2454193, Fax: (0712) 2454193

E-mail: dhanwatenationalcollege@yahoo.com ■ Website: http:#dhanwatenationalcollege.com


**5.1.5 - The Institution has a transparent mechanism for timely redressal of student grievances including sexual harassment and ragging cases**

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती

**धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर**

**शिस्त, अँटी रॅगिंग, तक्रार आणि निराकरण समिती**

दि. ३ मार्च २०२३ ला संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त

दि. ३ मार्च २०२३ ला सकाळी ११.१५ वाजता मिटिंग हॉल मध्ये शिस्त, अँटी रॅगिंग, तक्रार आणि निराकरण समितीची सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेची सुरुवात मा. प्रभारी प्राचार्या डॉ भारती खापेकर यांच्या परवानगीने करण्यात आली. सभेला डॉ. देवेंद्र वानखडे, डॉ. एस एस दाढे, श्री एस एस गहरवार, डॉ पराग जोशी, डॉ राजेश तीमाने, श्री जे व्ही जिचकार, डॉ निलेश म्हात्रे, डॉ नितीन कराळे, प्रा. लोखंडे आणि हेमा पुरी उपस्थित होते.

**विषय क्र.१.** - प्रमाणे मागील सभा दि.१७ ऑगस्ट २०२२ चे इतिवृत्त वाचून मंजूर करण्यात आले.

**विषय क्र. २.** - या विषयांतर्गत चालू सत्रात शिस्त राबवितांना कोणकोणत्या अडचणी आल्यात त्यावर चर्चा करण्यात आली. या मध्ये प्रामुख्याने विद्यार्थी मागे जाणाऱ्या रोडच्या बाजूला गाद्या लावून बसतात त्यामुळे काही मुले चीडीमार करण्याच्या घटना घडत असतात. तसेच गार्ड चांगल्याप्रकारे आपली भूमिका पार पाडत नसल्याची बाब समोर आली. तर दुपारी १२ वाजल्या नंतर काही विद्यार्थी परिसरात जास्ती मस्ती करतांना आढळून येतात, पार्किंग चा प्रश्न फार महत्वाचा आहे, काही विद्यार्थी मागच्या स्टाफ पार्किंग मध्ये गाद्या लावतात, तसेच अनेक विद्यार्थी वर्ग होत नसल्यामुळे बाहेर फिरत असल्याची तक्रार करीत असतात, तर विद्यापीठ आणि इतर परीक्षेमुळे मागच्या बिल्डिंगमध्ये वर्ग लवकर सोडावे लागतात, त्यामुळे अभ्यासक्रम पूर्ण होत नाही आणि विद्यार्थी नाराज होत असल्याची बाब पुढे आली. एकूणच सर्व समस्या सोडविण्यासाठी आणि उद्भवणाऱ्या प्रश्नांवर नियंत्रण आणणे गरजेचे असल्या मुळे काही सूचना पुढे आल्यात, त्या खालीलप्रमाणे.

**ओळखपत्र** - बिना **ओळखपत्र** आणि महाविद्यालयाचा पोशाख अनिवार्य करून या शिवाय कुणालाही मुख्य गेटमधून प्रवेश देण्यात येवू नये.

**चांगले गार्ड** - आपल्या गेटवर चांगले कर्तव्यदक्ष गार्ड असयला पाहिजेत, सोबतच एक सेवानिवृत्त सर्विस मन ठेवण्यात यावा, जो परिसरात फिरून शिस्त राखण्याचे कार्य करेल.

**नियमित वर्ग घेणे** - सर्व प्राध्यापकांनी आपल्या ठरविक वेळेवर वर्गावर जावून विद्यार्थी कमी असले तरी पूर्ण वेळ तासिका घ्यावी, जेणे करून विद्यार्थी बाहेर फिरणार नाहीत.

**कॉलेज सुरु होण्याच्या वेळा** - सर्व अभ्यासक्रमाच्या वेळा वेगवेगळ्या आहेत, शक्य झाल्यास बीसीसीए ची वेळ ७ किंवा ८ वाजताची करावी.

**परीक्षा** - विद्यापीठ व्यतिरिक्त इतर परीक्षा घेण्याचे टाळावे, तसेच विद्यापीठाला विंटर आणि समर मध्ये पूर्ण क्षमतेने आणि कॉलेज चालू असतांना कमीत कमी परीक्षा देण्याबाबत लेटर देण्याचा निर्णय घेण्यात आला.

**तोडफोड बाबत** - वर्गातील डेक्स-बेंच, खुर्चा, टॉयलेटमधील नळ, युरिनल किंवा इतर ठिकाणी वारंवार तोडफोड होत असल्यामुळे अशा वर्दळीच्या ठिकाणी CCTV लावून त्याचा डिस्प्ले दर्शनीय भागात लावण्याची बाब पुढे आली.

शेवटी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त करून सभा संपल्याची घोषणा केली.

डॉ.देवेंद्र वानखडे

6/3/2023

आज दि 6/3/2023 ला शिस्तपालन, ॲन्टी रॅगिंग तक्रार व निवारण समितीची सभा कॉलेजच्या मिटींग हॉल मध्ये सकाळी ठीक 11.15 वाजता आयोजित करण्यात आली. सभेला खालील सदस्य उपस्थित होते.

सभेचे विषय -

1) मागील सभेचे इतिवृत्त वाचन व मंजूरी देणे

2) वर्षभरात शिस्त राखतांना आलेल्या अडचणीवर चर्चा करणे.

3) आणखी काय सुधारणा करता येत त्यावर चर्चा आणि निर्णय घेणे

4) मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय -

उपस्थित सदस्य -

1) डॉ. देवेंद्र वानखडे - [signature]
2) डॉ. सुभाष दाढे - Dadhe
3)
4) S.S. Gaharwar - [signature]
5) जयंत वि. चित्रकार - [signature]
6) डॉ. राजेश मधुकर तिमाने - [signature]
7) Asst Prof Nitin Karale [signature]
8) Dr Parag M. Jodh [signature]
9) Mrs. H.Y. Puri Hpuri

Shri Shivaji Education Society's

# Dhanwate National College

## Discipline, Anti-Ragging Grievances and Redressal Committee

***NOTICE***

Date: 03/03/2023

The discipline, anti-ragging grievances and redressal committee meeting will be held on March 6, 2023 at 11.15 am in the meeting room. All the members of above committee are instructed to attend it.

Dr. D.C. Wankhade
Convener

Dr. Bharti Khapekar
Chairman (Off. Principal)

**Members of discipline, anti-ragging grievances and redressal Committee:-**

Dr. S. S. Dadhe

Mr. S. S. Gaherwar

Dr. Parag Joshi

Dr. S. B. Jambhulkar

Mr. J .V. Jichkar

Ms. S.R. Lokhande

Dr. D. N. Khadse

Dr. Rajesh Timane

Dr. Nilesh Mahtre

Mrs. Hema Puri

Dr. Arvind Khadse

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती

**धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर**

**शिस्त, अँटी रॅगिंग, तक्रार आणि निराकरण समिती**

दि. १७ ऑगस्ट २०२२ ला संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त

दि. १७ ऑगस्ट २०२२ ला सकाळी ११.१५ वाजता मा.प्राचार्य यांच्या परवानगीने मिटिंग हॉल मध्ये शिस्त, अँटी रॅगिंग, तक्रार आणि निराकरण समितीची सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला डॉ. देवेंद्र वानखडे, डॉ. एस एस दाढे, श्री एस एस गहरवार, डॉ पराग जोशी, डॉ शोभा जम्भूलकर, डॉ राजेश तीमाने, श्री जे व्ही जिचकार, डॉ निलेश म्हात्रे आणि हेमा पुरी उपस्थित होते.

**विषय क्र.१.** प्रमाणे सत्र २०२२-२३ मध्ये महाविद्यालयात शिस्त राहण्यासाठी नियोजन करण्याबाबत वेगवेगळ्या बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

**ओळखपत्र** - बिना **ओळखपत्र** कुणालाही मुख्य गेटमधून प्रवेश देण्यात येवू नये, यासाठी ज्या विद्यार्थ्यांचे कॉलेजमध्ये प्रवेश निश्चित झालेत त्यांना त्याच दिवशी ओळखपत्र देण्यात यावे. जर काही कारणास्तव त्या दिवशी बनले नाही तर दुसऱ्या दिवशी सकाळी त्या विद्यार्थ्यांचे ओळखपत्र देण्याची व्यवस्था असावी.

**उशिरा येणारे विद्यार्थी** - बाहेर गावावरून किंवा **उशिरा येणाऱ्या** विद्यार्थ्यांबाबत चर्चा झाली, आणि सर्वानुमते ठरविण्यात आले की उशिरा येणाऱ्यांना समज देवून वर्गात पाठवावे आणि वर्ग शिक्षकांनी त्यांना वर्गात घेवून यानंतर वेळेवर येण्यासाठी प्रेरणा द्यावी. कारण या विद्यार्थांना वर्गात न घेतल्यास हे विद्यार्थी पोर्चमध्ये किंवा बाहेर मस्ती करतात, एवढेच नाही तर त्यांच्यात वर्गात बसण्याची रुची निर्माण होत नाही आणि वर्षभर वर्ग करत नाहीत.

**वर्ग नसल्यास** - जेव्हा एखाद्या वर्ग खोलीत शिक्षक उपस्थित नाहीत, किंवा त्यांचा वर्गच नाही अशा वेळी त्या मजल्यावरील चपराश्याने त्या विद्यार्थ्यांना कॉमन रूम किंवा ग्रंथालयात बसवावे.

**रीडिंग रूम** - रीडिंग रूमचा वापर करणाऱ्या सर्वच मुलांना कॉलेज ओळखपत्र व गणवेश अनिवार्य करण्यात यावा.

**तोडफोड बाबत** - वर्गातील डेक्स-बेंच, खुर्चा, टॉयलेटमधील नळ, युरिनल किंवा इतर ठिकाणी वारंवार तोडफोड होत असल्यामुळे अशा वर्दळीच्या ठिकाणी CCTV लावून त्याचा डिस्प्ले दर्शनीय भागात लावण्याची बाब पुढे आली.

**विषय क्र. २.** - नुसार समिती सदस्यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली, त्याचा स्वतंत्र तक्ता सोबत जोडला आहे,

**विषय क्र. ३** - महाविद्यालय परिसरात भिंतीवर किंवा इतर ठिकाणी खर्रा खावून थुंकल्याचे मा. अध्यक्ष यांच्या निदर्शनात आल्यामुळे या पुढे सर्व कर्मचारी यांना सूचना देवून पुढे जर कोणी खर्रा खावून महाविद्यालय परिसरात दिसले तर त्यांना रु. ५००/ दंड करण्याचा निर्णय घेण्यात आला.

शेवटी डॉ सुभाष दाढे यांनी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त करून सभा संपल्याची घोषणा केली.

17/08/2022

आज दि. 17/8/2022 ला सकाळी ठीक 11.15 वाजता मिटींग हॉल मध्ये शिस्तपालन, ॲंटी रॅगिंग तक्रार व निवारण समितीची सभा आयोजित करण्यात आली होती.

सभेचे विषय -

१) सत्र २०२२-२३ मध्ये कॉलेजमध्ये शिस्त राहण्यासाठी नियोजन.
२) समिती सदस्यांची जबाबदारी निश्चित करणे
३) मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.

सभेला उपस्थित सदस्य -

१) डॉ. देवेंद्र वानखडे -
२) डॉ. सुभाष राठे -
३) S. S. Gahanwar -
४) जयंत वि. पिंपळकर
५) Dr. Nilesh Mhatre -
६) Dr. Arvind Khadse -
७) Dr. Rajesh Timane -
८) Asst. Prof. Nitin Karale
९) S. R. Lokhande
10) Mrs. H. Y. Puri
11) Dr. Parag M Joshi